# जिल्हा निवड समिती, सांगली

## जिल्हा परिषद सांगली अंतर्गत वर्ग-३ सरळसेवा पद भरती सन- २०१५

## जाहिरात क्रमांक सांप्रवि-आस्था-१-२०१५ दिनांक २/११/२०१५

**(शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील पत्र क्र.एपिटी-२०१४/प्र.क्र.१३९/आस्था-८ दि.२१/४/२०१५ व वित्त विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१ दिनांक २ जून २०१५ ३ (ब) व (क) मध्ये नमूद केले प्रमाणे)**

सांगली जिल्हा परिषद यांच्या आस्थापनेवरील व त्यांच्या अधिपत्याखालील विविध विभागात खाली नमूद केलेल्या (जिल्हा सेवा तांत्रिक / अतांत्रिक) वर्ग-३ संवर्गाच्या रिक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून लेखी परीक्षेसाठी जिल्हा परिषद, सांगली यांच्या मार्फत विहित नमुन्यात **दि.२/११/२०१५ पासून दिनांक १६/११/२०१५** पर्यत सायकांळी १७.४५ वाजेपर्यत ऑन लाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ज्या उमेदवारांनी जिल्हा सेवा योजन अधिकारी, सेवा योजन कार्यालय जिल्हा सांगली, सहाय्यक संचालक, विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र, प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव ता.आंबेगांव जि.पुणे व जिल्हा विशेष समाजकल्याण अधिकारी, कार्यालय सांगली इत्यादी कार्यालयात नाव नोंदणी केली असेल त्यांनी देखील ते इच्छूक व पात्र असल्यास विहित शुल्क भरुन या पदासाठी **ऑन लाईन** अर्ज करणे आवश्यक राहील. पद भरतीसाठी पद निहाय सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षणाचा तपशील खालील विवरण पत्रात नमूद केले प्रमाणे आहे. गट क मधील पदांसाठी उमेदवारांची निवड जिल्हाधिकारी सांगली, यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीमार्फत केली जाईल. तसेच सदरची जाहिरात व विहित अर्जाचा नमुना मा.जिल्हाधिकारी, सांगली कार्यालयाच्या www.sangli.nic.in व जिल्हा परिषद, सांगलीच्या www.zpsangli.in किंवा http://198.24.159.244/ZPSANGALI या संकेतस्थळावर उपलब्ध असून अधिकृत फक्त ऑन लाईन पद्धतीने अर्ज मागविणेत येत आहेत.

**रिक्त पदांचा तपशिल**

| अ.क्र | पदाचे नांव | एकूण पद | अ.जा. | अ.ज. | विजा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | औषध निर्माण अधिकारी | ३ | ० | इतर-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | अंशकालीन -१ इतर-१ |
| २ | अंगणवाडी पर्यवेक्षिका | २ | ० | इतर-१ | ० | ० | ० | ० | इतर -१ | ० | ० |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) ५० % हंगामी फवारणी कर्मचारी मधून | ८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | माजीसैनिक -१<br>अंशकालीन -१<br>इतर-६<br>-----------<br>एकूण -८ |
| ४ | आरोग्य सेवक (महिला) | ३८ | ० | ० | ० | ० | इतर-२ | इतर-१ | इतर-१ | ० | माजीसैनिक -५<br>अंशकालीन -४<br>प्रकल्पग्रस्त-२<br>भूकंपग्रस्त-१<br>खेळाडू - २<br>अस्थिव्यंग-१ (O.L.)<br>इतर-१९<br>-----------<br>एकूण -३४ |
| ५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ग्रा.पा.पु. | २ | ० | इतर-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | माजीसैनिक -१ |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम | १ | ० | इतर-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | पशुधन पर्यवेक्षक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | कर्णबधीर -१ (HH) |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | इतर -१ |
| ९ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ पदे अपंग<br>१)कर्ण बधीर -१ (HH)<br>२)अस्थी व्यंग-१(B.L.)(O.L.) |
| १० | विस्तार अधिकारी (शिक्षण)वर्ग-३ श्रेणी-२ | १ | इतर-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| १२ | कंत्राटी ग्रामसेवक | ३६ | माजी सैनिक २ | महिला-३<br>माजीसैनिक -४<br>अंशकालीन -१<br>इतर-१<br>----------<br>एकूण -९ | ० | इतर-१ | ० | ० | ० | माजी सैनिक १ | महिला - ७<br>माजीसैनिक -४<br>अंशकालीन -२<br>प्रकल्पग्रस्त-१<br>खेळाडू -१<br>इतर-८<br>-----------<br>**एकूण -२३** |

| अ. क्र | पदाचे नांव | एकुण पद | अ.जा. | अ.ज. | विजा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम विभागाकडील) | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | महिला-१<br>इतर-१ |
| | एकुण एकंदर | ९८ | ३ | १३ | ० | १ | २ | १ | २ | १ | ७५ |

## पदांबाबतची माहिती:-

| अ.क्र | पदाचे नाव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व पात्रता | प्रश्नपत्रिका दर्जा व स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १ | औषध निर्माण अधिकारी | ५२००-२०२०० + (२८०० ग्रेड पे) | १० वी उत्तीर्ण, डि.फार्मसी अभ्यासक्रम उत्तीर्ण व औषध शाळा अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत निर्माते. | सर्व विषय एस.एस.सी.दर्जाची परिक्षा व औषध शास्त्रसंबंधी प्रश्न.<br>(लेखी परीक्षा २०० गुण ) |
| २ | अंगणवाडी पर्यवेक्षिका | ९३००-३४८०० + (४१००ग्रेड पे) | एखाद्या संविधिक विद्यापीठाची, खासकरुन समाजशास्त्र किंवा गृहविज्ञान किंवा शिक्षण किंवा बालविकास किंवा पोषण या विषयातील स्नातक ही पदवी धारण केलेली असावी. | मराठी १२ वी दर्जा व इतर पदवी दर्जाची परिक्षा.<br>(लेखी परीक्षा २०० गुण ) |
| ३ | **आरोग्य सेवक (पुरुष) ५०% हंगामी फवारणी कर्मचारी मधून** | ५२००-२०२०० + (२४००ग्रेड पे) | विज्ञान या विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र उत्तिर्ण, राष्ट्रिय मलेरिया प्रतिरोध कार्य क्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून किमान ९० दिवसाच्या अनुभवाचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र बंधनकारक राहिल. | सर्व एस.एस.सी.दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न<br>(लेखी परीक्षा २०० गुण ) |
| ४ | **आरोग्य सेवक (महिला)** | ५२००-२०२००+ (२४०० ग्रेड पे) | महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट पाच कलम ३ (दहा) नुसार आरोग्य सेवक (महिला) या पदासाठी खालीलप्रमाणे अर्हता आवश्यक आहे.<br>१) आधी पासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षापेक्षा अधिक नसेल आणि<br>२) ज्यांची अर्हता प्राप्त साह्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या मध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील अशा उमेदवारांच्या नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करता येतील असे स्पष्ट केलेले आहे. | एस.एस.सी.दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न.<br>(लेखी परीक्षा २०० गुण ) |
| ५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील पदांसाठी ) | ९३००-३४८००+ (४३०० ग्रेड पे) | महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ठ-सहा नियम ५ मधील कलम २ (एक) (ब) (दोन) नुसार स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यता प्राप्त पदविका (तीन वर्षाचा पाठ्यक्रम) किंवा तुल्य अर्हता. | सर्व विषय एस.एस.सी.दर्जा व अभियांत्रिकी पदविका दर्जाची परिक्षा.<br>(लेखी परीक्षा २०० गुण ) |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)(बांधकाम विभागाकडील पदांसाठी ) | ९३००-३४८००+ (४३०० ग्रेड पे) | महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ठ-सहा नियम ५ मधील कलम २ (एक) (ब) (दोन) नुसार स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यता प्राप्त पदविका (तीन वर्षाचा पाठ्यक्रम) किंवा तुल्य अर्हता. | सर्व विषय एस.एस.सी.दर्जा व अभियांत्रिकी पदविका दर्जाची परिक्षा.<br>(लेखी परीक्षा २०० गुण ) |
| ७ | पशुधन पर्यवेक्षक | ५२००-२०२००+ (२४०० ग्रेड पे) | ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक : सेप्रनि-२०१०/प्र.क्र.१३३/आस्था-९, मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक १२ मे, २०१० च्या महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश)(सुधारणा) निमय, २००९ पशुधन पर्यवेक्षक पदाचे सेवाप्रवेश नियमानुसार " जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र उत्तीर्ण झाल्यानंतर पशुसंवर्धन संचालनालयाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्याच्या तंत्रशिक्षण परीक्षा मंडळामार्फत किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठामार्फत चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला दोन वर्षाचा दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील किंवा वैधानिक विद्यापीठामधील पशुवैद्यकिय शास्त्रातील पदवी धारण करीत असतील तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विदयापिठ नागपूर यांच्या मार्फत चालविणेत येणारा पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका प्रमाणपत्र अभ्यास क्रम उत्तीर्ण असे उमेदवार अर्ज करणेस पात्र आहेत " | मराठी १२ वी दर्जा विज्ञान व आरोग्य संबंधी प्रश्न पदविका दर्जाची परिक्षा<br>(लेखी परीक्षा २०० गुण ) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | **कनिष्ठ सहाय्यक (लेखा)** | ५२००-२०२०० + (१९००ग्रेड पे) | **एक)** आधिपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्याचे वय खुला ३३ व मागासवर्गीय ३८ वर्षापेक्षा अधिक नसेल.<br>**दोन)** माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि<br>**तीन)** महाराष्ट्र शासनाचा शासकीय कर्मचाऱ्यांची मराठी टंकलेखन व लघूलेखन यातील परिक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परिक्षा विभाग, शिक्षण संचनालय , महाराष्ट्र राज्य यांनी मराठी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवूण माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल.<br>परंतू असे की इंग्रजी विषय घेवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा समतूल्य परिक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना पंसती दिली जाईल.<br>परंतू आणखी असे की, पदोन्नतीने अथवा नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तीना महाराष्ट्र शासनाने प्रचलित नियमानुसार वेळोवेळी विहीत केलेली संगणक हाताळणी / वापरा बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील<br>२) कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्यासाठी लेखाविषयक कामकाजाचा पुर्वानूभव असलेल्या उमेदवारास अधिक पंसती दिली जाईल.<br>३) नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने यापैकी कोणत्याही मार्गाने नेमणूक झालेल्या व्यक्तीला त्या पदावर नेमणूक झालेची तारीख अथवा अशाप्रकारच्या विभागीय परिक्षेचे नियम विहीत करणारी तारीख यातील जी तारीख नंतरची असेल त्या तारखेपासून दोन वर्षाच्या आत विभागीय परिक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल. किंवा<br>४) शासन मान्यता प्राप्त वाणिज्य संस्थांमधील खालीलप्रमाणे संगणक टंकलेखन उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.<br>अ) बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी ३० श.प्र.मि.(सहा महिने)<br>ब) बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी ४० श.प्र.मि.(सहा महिने)<br>क) स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स ॲण्ड स्टुडंटस्.(तीन महिने) | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परिक्षा.<br>(लेखी परीक्षा २०० गुण) |
| ९ | **कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)** | ५२००-२०२००+ (१९०० ग्रेड पे) | १) आधिपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्याचे वय ३३ वर्षापेक्षा अधिक नसेल<br>२) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि<br>३) महाराष्ट्र शासनाच्या शासकिय कर्मचाऱ्यांसाठी मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकिय परीक्षा विभाग शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनीटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक किंवा<br>३) टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. किंवा<br>४) शासन मान्यता प्राप्त वाणिज्य संस्थांमधील खालीलप्रमाणे संगणक टंकलेखन उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.<br>अ) बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी ३० श.प्र.मि.(सहा महिने)<br>ब) बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी ४० श.प्र.मि.(सहा महिने)<br>क) स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स ॲण्ड स्टुडंटस्.(तीन महिने) | सर्व विषय एस.एस.सी.दर्जाची परीक्षा<br>(लेखी परीक्षा २०० गुण) |
| १० | **विस्तार अधिकारी (शिक्षण)** | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | मान्यता प्राप्त विदयापिठाचे स्नातक असतील आणि २) अ बी एड पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) घेतल्यानंतरच्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळातील अगर कनिष्ठ महाविदयालयातील कमीत कमी तीन वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल किंवा २) ब) बाी एड पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) घेतल्यानंतरच्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा तपासण्याचा कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव असेल किंवा क) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा पास झाल्यानंतरचा पाच वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आणि शिक्षकाचे प्रशिक्षण घेतले असेल | मराठी १२ वी दर्जा शिक्षण शास्त्र संबंधी व इतर प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा<br>(लेखी परीक्षा २०० गुण) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | **विस्तार अधिकारी (सांखिकी)** | ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | मान्यता प्राप्त विदयापिठाची विज्ञान, कृषी,वाणिज्य किंवा कला शाखेची अर्थशास्त्र,गणित किंवा संख्याशास्त्र (सांखिकी) या पैकी एक विषय घेऊन प्रथम अथवा द्वितिय श्रेणीत पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक किंवा दोन्ही वरील विषयांपैकी एक विषय घेऊन पदव्यूत्तर पदवी प्राप्त करणाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल आणि संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेली परीक्षा उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक. | सर्व विषय पदवी दर्जाची परीक्षा प्रश्न (लेखी परीक्षा २०० गुण) |
| १२ | **कंत्राटी ग्रामसेवक** | दरमहा मानधन रु.६०००/- (सहा हजार मात्र) आणि नियमानुसार कायम प्रवासभत्ता | अ) उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यू.) आणि संगणक हाताळणी / वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. **किंवा**<br>ब) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता आणि कृषि विषयाची पदविका (दोन वर्षाचा अभ्यासक्रम) धारण करणे आवश्यक | **सर्व विषय एच.एस.सी.दर्जाची परिक्षा व कृषि पदविका दर्जाचे प्रश्न** (लेखी परीक्षा २०० गुण ) |
| १३ | **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** | ५२००-२०२०० + (२४०० ग्रेड पे) | १) शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण.<br>२) महाराष्ट्र शासनाचे तथा शासन मान्य संस्थेतून तंत्रशिक्षण विभागाच्या शासकिय संस्थेकडून घेण्यात येणारी आर्किटेक्चरल ड्राफ्टसमन (वास्तुशास्त्रीय आरेखक) पाठ्यक्रम उत्तीर्ण किंवा<br>३) महाराष्ट्र शासनाचे तथा शासन मान्य संस्थेतून तंत्रशिक्षण विभागाच्या शासकिय संस्थेकडून घेण्यात येणारी कंन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक) पाठ्यक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र शासनाचे तथा शासन मान्य संस्थेतून तंत्रशिक्षण विभागाच्या शासकिय संस्थेकडून घेण्यात येणारी आरेखक (स्थापत्य) या दोन वर्षाचा पाठ्यक्रम उत्तीर्ण किंवा सैनिकी सेवेतील कंन्स्ट्रक्शन सुपरवायझर या पदावरील त्या शाखेतील अनुभवाच्या आधारे देण्यात येणारे NCTVT / NAC चे प्रमाणपत्र<br>४) शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासकिय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक एक वर्ष मुदतीची पाठ्यक्रम परिक्षा उत्तीर्ण<br>५) महाराष्ट्र शासन ग्रा.वि.वि.कडील दि.१७/०४/२०१० च्या शासन निर्णयान्वयें सन १९८०-८१ ते ८१-८७ चे दरम्यान तंत्रशिक्षण विभागाच्या शासकिय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्ष मुदतीचा पाठ्यक्रम परिक्षा उत्तीर्ण केलेल्या उमेदवाराच्या बाबतीत शासकिय तंत्र शिक्षण विभागाकडील प्रमाणपत्राच्या अधिन राहून वयोमर्यादा ४७ वर्षापर्यंत शिथीलक्षम. | एस.एस.सी.दर्जाची परिक्षा व तांत्रिक प्रश्न. (लेखी परीक्षा २०० गुण) |

- **<u>अर्ज सादर करणेचा कालावधी -</u>**

| अक्र. | पदाचे नांव | अर्ज सादर करणेचा कालावधी | बँकेत विहीत चलनाद्वारे परीक्षा शुल्क करणेचा अंतिम दिनांक | परीक्षेचा दिनांक व वेळ | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होणेचा कालावधी | पदासंदर्भात सदस्य सचिव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | औषध निर्माण अधिकारी | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | बुधवार, दि.२५/११/२०१५ सकाळी - १०.०० ते ११.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, सांगली |
| **२** | **अंगणवाडी पर्यवेक्षिका** | **दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५** | **दिनांक १८/११/२०१५** | **बुधवार, दि.२५/११/२०१५ दुपारी - २.०० ते ३.३०** | **दिनांक २१/११/२०१५** | **सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) जिल्हा परिषद, सांगली** |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के हंगामी फवारणी कर्मचारी मधून | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | बुधवार, दि.२५/११/२०१५ दुपारी - २.०० ते ३.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, सांगली |
| ४ | आरोग्य सेवक (महिला) | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | बुधवार, दि.२५/११/२०१५ दुपारी - २.०० ते ३.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, सांगली |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)(ग्रापापु) जिल्हा परिषद, सांगली | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | शनिवार, दि.२८/११/२०१५ सकाळी - १०.०० ते ११.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता (ग्रापापु) जिल्हा परिषद, सांगली |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (इ व द)जिल्हा परिषद, सांगली | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | शनिवार, दि.२८/११/२०१५ सकाळी - १०.०० ते ११.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता (इ व द)जिल्हा परिषद, सांगली |
| ७ | पशुधन पर्यवेक्षक | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | शनिवार, दि.२८/११/२०१५ सकाळी - १०.०० ते ११.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, सांगली |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | शनिवार, दि.२८/११/२०१५ सकाळी - १०.०० ते ११.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, सांगली |
| ९ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | शनिवार, दि.२८/११/२०१५ दुपारी - ०२.०० ते ०३.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जिल्हा परिषद, सांगली |
| १० | विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी-२ | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | शनिवार, दि.२८/११/२०१५ दुपारी - ०२.०० ते ०३.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद, सांगली |
| ११ | विस्तार अधिकारी (सांखिकी) | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | रविवार, दि.२९/११/२०१५ सकाळी - १०.०० ते ११.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) जिल्हा परिषद, सांगली |
| १२ | कंत्राटी ग्रामसेवक | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | बुधवार, दि.२/१२/२०१५ सकाळी - १०.०० ते ११.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) जिल्हा परिषद, सांगली |
| १३ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | दि.२/११/२०१५ ते दि.१६/११/२०१५ | दिनांक १८/११/२०१५ | बुधवार, दि.२/१२/२०१५ दुपारी - ०२.०० ते ०३.३० | दिनांक २१/११/२०१५ | सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता (इवद) जिल्हा परिषद, सांगली |

**टीप-दि.२/११/२०१५ ते १६/११/२०१५ पर्यंत सायंकाळी १७.४५ पर्यंत ऑनलाईन अर्ज स्वीकारले जातील. यानंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.**

## महत्वाच्या सूचना

**१) समांतर आरक्षणाचे प्रवर्गातून पात्र उमेदवार उपलब्ध न झालेस सदर पदासाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातून सर्वसाधारण (इतर)उमेदवारांमधून शासन नियमानुसार भरणेत येतील.**

२) निवड यादीमध्ये नाव असले तरी नियुक्ती बाबत हक्क सांगता येणार नाही.

३) ज्या पदांच्या बाबतीत कोर्ट केसेस प्रलंबित आहेत त्यांचे बाबतीत कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून निवड करणेत येतील. संबधित उमेदवारास कोर्टाचा निर्णय बंधनकारक राहिल.

४) अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून, आंतर जिल्हा बदली किंवा इतर कारणाने उपरोक्त दर्शविलेली पदसंख्या / आरक्षण यात बदल होऊ शकतो. त्यामुळे निवडयादीमध्ये नाव असले तरी नियुक्ती देणे बंधनकारक असणार नाही.

५) पर्यवेक्षिका (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) आरोग्य सेवक (महिला) या पदासाठी फक्त महिला उमेदवारच अर्ज करु शकतील.

६) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.अपंग/१००९/प्र.क्र.२७६/०९/ १६ अ, दिनांक १९/३/२०१० मधील सूचनांनुसार अपंगासाठी आरक्षित असलेली पदे खुली म्हणून घोषित केली आहेत. या पदासाठी कोणत्याही सामाजिक प्रवर्गातील पात्र अपंग उमेदवार अर्ज करु शकतील. (तथापि प्रत्यक्ष निवडीत या पदावर निवड झालेले उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गाचे असल्यास त्यांना निवडीनंतर मागासवर्गीय बिंदूवर समायोजित करणेची मुभा नियुक्ती प्राधिकाऱ्याला राहिल.)

७) या जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता/इतर अर्हता/वयोमर्यादा अर्ज करतेवेळी उमेदवाराने धारण केलेली असणे आवश्यक आहे. वयोमर्यादेसाठी ऑनलाईन अर्ज स्विकारणेचा शेवटचा दिवस हा संदर्भ दिनांक राहिल.

## १. वयोमर्यादा :-(ऑन लाईन अर्ज स्विकारणेच्या शेवटच्या दिवशी)

**उमेदवाराची वयाची किमान व कमाल मर्यादा ही त्या पदासाठी अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या दिनांकास परिगणित करण्यात येईल.**

अ) सर्व पदांसाठी वयाची अट किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३८ वर्षे राहील.

ब) अपंग, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त यांचेसाठी वय वर्षे ४५ पर्यंत शिथीलक्षम राहील.

क) सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकिय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

ड) खुल्या प्रवर्गातील खेळाडुंसाठी वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय खेळाडूंसाठी वयोमर्यादा ४३ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

ई) संरक्षण दलात सहा महिन्यापेक्षा जास्त सेवा केलेल्या माजी सैनिकांचे बाबतीत त्यांनी केलेली एकूण सेवा अधिक तीन वर्षे इतका कालावधी शिथीलक्षम राहील व विकलांग माजी सैनिकांसाठी वय वर्षे ४५ पर्यंत शिथीलक्षम राहील.

फ) आ.सेवक (म) पदासाठी कमाल वयोमर्यादा ४० व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५ वर्षे शिथीलक्षम राहिल.

ग) आरोग्य सेवक पुरुष (५० टक्के फवारणी मधून) ज्यांचे वय ३३ पेक्षा जास्त आहे अशा उमेदवाराच्या बाबतीत महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एपिटी२०१४/प्र.क्र.२२४/आस्था-८/दिनांक २१ ऑक्टोबर २०१४ अन्वये राष्ट्रिय हिवताप प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत क्षेत्र कर्मचारी म्हणून प्रत्येक वर्षी किमान ९० दिवस कार्यरत असलेल्या हंगामी क्षेत्र कर्मचाऱ्याच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे पर्यंत शिथील करणेत आलेली आहे.

## २) परीक्षा शुल्कः-

खाली नमूद केल्यानुसार मागासवर्गीय उमेदवारांकरिता व इतर उमेदवारांकरिता परीक्षा शुल्क आकारणेत येईल. **माजी सैनिकांना अर्जासोबत परिक्षा शुल्क भरण्याची अट लागू नाही.**

| **पदाचे नाव** | **मागासवर्गीय उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क** | **इतर उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क** |
|---|---|---|
| **सर्व पदांसाठी** | **रुपये १५०/- (रुपये एकशे पन्नास मात्र )** | **रुपये ३००/- (रुपये तीनशे मात्र )** |

## ३) अर्ज करणेची पद्धत

१) प्रस्तुत पदांकरिता फक्त अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेचे माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

२) पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज मा.जिल्हाधिकारी, सांगली कार्यालयाच्या www.sangli.nic.in व जिल्हा परिषद, सांगलीच्या www.zpsangli.in किंवा http://198.24.159.244/ZPSANGALI या वेबसाईटद्वारे दि.२/११/२०१५ ते १६/११/२०१५ पर्यंत सायंकाळी १७.४५ पर्यंत ऑनलाईन अर्ज स्वीकारले जातील. यानंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

३) उमेदवारांने ऑनलाईन आवेदन अर्ज भरताना जाहिरात डाऊनलोड करुन काळजीपुर्वक वाचावी.

४) अर्जदाराने फोटो आणि स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावे. फोटो ३५ केबीपेक्षा कमी असावा आणि स्वाक्षरी ३० केबीपेक्षा कमी असावी.

५) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया चलनाची प्रिंटआऊट काढणे आवश्यक आहे. चलनात दर्शविलेल्या रक्कमेचा भरणा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत करण्यात यावा.

६) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर तयार होणा-या चलनाची प्रिंटआऊट काढून सदर चलनात नमुद फी (रक्कम) अर्ज सादर केल्यावर ३६ तासानंतरच स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत भरणा करावी. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये चलनाने फी जमा करण्याचा अंतिम दिनांक १८/११/२०१५ असेल.

७) अर्जदाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरलेनंतर त्याची स्थिती मा.जिल्हाधिकारी, सांगली कार्यालयाच्या www.sangli.nic.in व जिल्हा परिषद, सांगलीच्या www.zpsangli.in किंवा http://198.24.159.244/ZPSANGALI या संकेतस्थळावर पाहता येऊ शकेल.

८) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा चालू ई-मेल आयडी व स्वतः चा अद्यावत (Latest) फोटो असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नांदविलेल्या ई-मेल आयडीद्वारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व या बाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच उमेदवाराचे स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र परिक्षेच्या दिवशी सोबत आणणे आवश्यक आहे.(पॅन कार्ड,ड्रायव्हिंग लायसन्स,मतदान ओळखपत्र,आधारकार्ड )

९) उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी व मोबाईल क्र.चुकीचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्र.NCPR रजिस्टर्ड (Do Not Disturb) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास याची संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. तांत्रिक अडचणींना अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी सांगली हे जबाबदार राहणार नाहीत.

१०) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर मा.जिल्हाधिकारी, सांगली कार्यालयाच्या www.sangli.nic.in व जिल्हा परिषद, सांगलीच्या www.zpsangli.in किंवा http://198.24.159.244/ZPSANGALI या संकेतस्थळावरुन परिक्षेचे प्रवेश पत्र डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाने प्रवेशपत्र पाठवले जाणार नाही.प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परिक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

## ४. निवड यादीमध्ये समाविष्ठ उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहिल. तपशील खालील प्रमाणे---

१. ऑनलाईन अर्जाची प्रत व चलनाची मूळ प्रिंट

२. उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणत्याही कागदपत्रांची पूर्ण तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे शाळा सोडलेचा दाखला अनुभवाचा दाखला तसेच आवश्यक ती कागदपत्रे इ.ची छाननी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. त्यावेळी मूळ प्रमाणपत्रे दाखविणेही बंधनकारक राहील. उमेदवारांने प्रमाणपत्र मिळणेकरता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या (टोकन) ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही. नियुक्ती रद्द होईल. लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे प्राथमिक निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांचे कागदपत्र तपासणीसाठी मा.जिल्हाधिकारी, सांगली कार्यालयाच्या www.sangli.nic.in व जिल्हा परिषद, सांगलीच्या www.zpsangli.in किंवा http://198.24.159.244/ZPSANGALI या संकेतस्थळावर दिनांक जाहिर करणेत येईल. त्या दिवशी व संबंधित उमेदवारांनी जिल्हा परिषद सांगली येथे आवश्यक त्या मूळ (Original) कागदपत्रासह हजर राहणे आवश्यक राहील.

३. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या उमेदवारांना मूळ कागदपत्रांची तपासणी करणे करता बोलविणेत येईल. उमेदवारांना कागदपत्रे तपासणीचे वेळी मूळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. उमेदवारांनी प्रमाणपत्र मिळणेकरता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या (टोकन )ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती / आवेदनपत्र /प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

४. उक्त पदांसाठी छाननी न करता जाहिरातीनुसार परिपूर्ण अर्ज केलेल्या सर्व उमेदवाराना लेखी परीक्षा केंद्राचा सांकेतिक क्रमांक, वेळ व दिनांक इत्यादी तपशील म्मा.जिल्हाधिकारी, सांगली कार्यालयाच्या www.sangli.nic.in व जिल्हा परिषद, सांगलीच्या www.zpsangli.in किंवा http://198.24.159.244/ZPSANGALI या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र मा.जिल्हाधिकारी, सांगली कार्यालयाच्या www.sangli.nic.in व जिल्हा परिषद, सांगलीच्या www.zpsangli.in किंवा http://198.24.159.244/ZPSANGALI या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेणेची जबाबदारी संबधित उमेदवाराची राहिल.

५. लेखी परीक्षेसाठी व कागदपत्रांच्या छाननीसाठी उमेदवारास स्वखर्चाने यावे लागेल.

६. उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या पुष्ठ्यर्थ शैक्षणिक अर्हता, वयाचा पुरावा, जातीचा दाखला, डोमिसाईल प्रमाणपत्र (अधिवास), नॉन क्रिमीलेअर (उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे) प्रमाणपत्र, अपंगत्वाचा दाखला, माजी सैनिक असलेबाबतचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भूकंपग्रस्त प्रमाणपत्र, खेळाडू असलेचे प्रमाणपत्र, महिलांचे ३० टक्के आरक्षणासाठी वैध असणारे (नॉन क्रिमिलेअर) उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे प्रमाणपत्र ,स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशन प्रमाणपत्र, पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेली मूळ प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

७. वि जा अ/भ ज ब/भ ज क/भ ज ड/वि मा प्र/इ मा व व **खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणासाठी** अर्ज करणाऱ्या महिला यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले सन २०१५-१६ (अर्थात दिनांक १/४/२०१५ पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले) साठी वैध असलेली प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सोबत आणणे बंधनकारक राहिल.

८. शासकिय/निमशासकिय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांची परवानगी घेऊन भरणेचे आहेत. परवानगीची एक प्रत पडताळणीच्या वेळी जोडावी.

९. अंशकालीन उमेदवारांनी त्याच्या शासकीय अथवा निमशासकिय सेवेतील नियुक्त्यामध्ये ३ वर्षे पुर्ण अंशकालीन काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केलेल्या सर्व अंशकालीन उमेदवारांनी अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र पडताळणी वेळी आणणे आवश्यक राहिल.

१०. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१ जुलै २००५ नुसार लहान कुटूंब असलेचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पडताळणी वेळी सादर करणे आवश्यक राहील.

११. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुसाठी असलेले आरक्षण व वयोमर्यादेच्या शिथिलतेबाबत शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. रक्रिधो-२०००-प्रक्र-६८-क्रियुसे-२ दि.३० एप्रिल, २००५ मधील तरतुदींनूसार खेळाडुसाठी राखीव असलेल्या पदावर निवडीसाठी अर्हता पुढीलप्रमाणे असेल. सदर पदासाठी त्या-त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू. राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलंपीक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. अथवा महाराष्ट्र ऑलंपिक असोसिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. वैयक्तिकरित्या किंवा आंमत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही. खेळाडुंच्या आरक्षित पदावर नेमणूकी करता ज्या खेळाडुंची निवड होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, पुणे याचेकडे तपासणीसाठी पाठविणेत येईल व प्राप्त अहवालानुसार नियुक्ती बाबत विचार करणेत येईल.

१२. विस्तार अधिकारी (शिक्षण)वर्ग-३ श्रेणी-२ या पदांच्या बाबतीत अनुभवाच्या दाखल्यावर (शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक सहाय्यक संचालक/उपसंचालक/ सह संचालक उच्च शिक्षण) किंवा सक्षम अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी आवश्यक तसेच अनुभवाचा दाखला कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहिल.

## ५. सर्व पदांकरीता समान सूचना :-

१. उमेदवार हा भारतीय नागरीक असावा व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा त्याला मराठी भाषेचे ज्ञान असावे. उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहित केलेले सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

२. उमेदवार एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज करणार असलेस प्रत्येक पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्र ऑन लाईन अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच प्रत्येक पदासाठी वेगवेगळे परीक्षा शुल्क भरावे लागेल.

३. वर्ग-३ च्या सर्व पदांसाठी संगणक अर्हता पात्र प्रमाणपत्र(अ) D.O.E.A.C.C.किंवा ब (महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती नंतर विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. नसल्यास शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.प्रशिक्षण २०००/प्रकरण-६१/२००१/३९ दिनांक १९-३-२००३ अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून २ (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.

४. सेवेत आल्यानंतर शासनाने विहित केलेले प्रशिक्षण व सेवाप्रवेशोत्तर, व्यावसायीक, भाषा,विभागिय इत्यादी परीक्षा विहित कालावधीत व विहित संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. अन्यथा नेमणूक मिळाली तरी ती संपुष्टात आणली जाईल

५. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील तरतूदी व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा उमेदवारास सेवेत आलेनंतर बंधनकारक राहतील.

६. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत सादर करणेच्या अटीवर व मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अधीन राहून नियुक्ती दिली जाईल. सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्रासाठी परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करुन वैधता प्रमाणपत्र सादर न केलेस कोणतीही नोटिस न देता सेवा समाप्त करणेत येईल. नियुक्ती दिलेनंतर जात पडताळणीसाठीचा प्रस्ताव हा संबंधित समितीकडे सादर केलेची पोहोच उमेदवाराने कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

७. गुणवत्ता यादीत आलेनंतर प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी संबधीत जिल्ह्यातील जिल्हाधिकारी/ जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडून पडताळणी झालेनंतरच नियुक्ती बाबत विचार करणेत येईल.

८. अपंग आरक्षणातुन निवड केलेल्या उमेदवारांना शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकिय मंडळाने तो उमेदवार निवड केलेल्या पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिलेवरच नियुक्ती देणेत येईल. अपंग उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी लेखनीक आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमूद करावे.

९. नैसर्गीक आपत्तीमुळे विहीत दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परीक्षा घेणेत येईल. याबाबत वर्तमानपत्रातून जाहिरातीद्वारे प्रसिध्दी देणेत येईल.

१०. उमेदवाराने विहित अर्हता धारण केली परंतू अर्ज अपूर्ण अथवा चुकीचा भरला असलेस लेखी परिक्षेला बोलविण्याचा /बसणेचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

११. आ.सेवक (महिला) पदासाठी साडे तीन वर्षाचा परिचारिका प्रसाविका (जी.एन.एम) चा कोर्स पूर्ण केलेले उमेदवार अपात्र ठरतील. मात्र ए.एन.एम.चा १८ महिन्याचा कोर्स उत्तीर्ण झालेले उमेदवार अर्ज करु शकतील.

१२. शासन परिपत्रक क्र.पीआरइ २००४/३८५५/प्राशि १.१ दि.२ जुन २००५ नुसार **माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यु झालेल्या किंवा अपंगत्व येवून नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त जवानांची पत्नी किंवा अपंग**

**जवानाची पत्नी यांना नियुक्ती देणेचे धोरण आहे.** त्यानंतर त्याची अविवाहीत मुलगी/अविवाहीत मुलगा यांचा समावेश आहे. व त्यांचा १५% समांतर आरक्षणातुन विचार करणेत येईल.

१३. एखादा उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष कोणत्याही वेळी दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून वगळणेत येईल.

१४. सेवा योजन कार्यालय, आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, जिल्हाधिकारी , जिल्हा सैनिक बोर्ड यांचेकडून शिफारस होणा-या जनगणना, अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक ,इ.उमेदवारांनी त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार जाहिरातीप्रमाणे शुल्क भरुन विहित पदासाठी व मुदतीत जिल्हा परिषदेकडे ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे.

**१५. महाराष्ट्र शासन वित्त विभाग कडील निर्णय क्र.अनियो/१००५/१२६ सेवा-४ दि.३१ ऑक्टोंबर २००५ नुसार दि.१ नोव्हेंबर २००५ नंतर ज्यांची शासकिय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन अंशदायी परिभाषित निवृत्ती वेतन योजना लागू राहिल. तथापि सद्याची सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ तसेच म.ना.से.(निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ लागू होणार नाही.**

१६. रिक्त पदाच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे/ रद्द करणे, अंशतः बदल करणे इ. बाबतचे सर्व अधिकार हे जिल्हा निवड समिती, सांगली स्वतःकडे राखून ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही. भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव उमेदवार अपात्र आढळलेस त्यास प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

१७. उमेदवारांचा गुणवत्ता यादीत अंतर्भाव करणेसाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

१८. जाहिरातीमध्ये काही संवर्गाची रिक्त पदे ही माहे एप्रिल २०१६ अखेर रिक्त होणारी दर्शविलेली असलेने सदरची पदे जसजशी रिक्त होतील त्यानुसार अंतिम निवड यादीतील जेष्ठतेनुसार नियुक्ती आदेश देणेची कार्यवाही करणेत येईल.

१९. जाहिरातीमधील काही मुद्दे विसंगत असल्यास शासन निर्देश अंतिम राहतील.

२०. उपरोक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव किमान अर्हता व अनुभव दर्शवित आहेत.

२१. वर्ग-३ च्या भरतीचे अध्यक्ष हे अध्यक्ष जिल्हा निवड समिती, सांगली तथा जिल्हाधिकारी सांगली असतील

२२. संपूर्ण भरती प्रक्रियेसंबंधात देखरेख व तपासणी इत्यादिचे अधिकार मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना राहतील.

**सही/-दिलीप पाटील**
**सदस्य, जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सांगली**

**सही/-शेखर गायकवाड**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, सागली**